• वर्ष : ०३ • अंक : २७३ • पुणे • बुधवार, दि. २४ जून २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक






एकात्मिक किनारी सुरक्षा
कायदा लागू करण्याची मागणी 3



मेंटेनन्स टाळण्याचा अधिकार
सदस्यांना नाही 4

## ठळक बातम्या

### चेहरा पूर्णपणे दिसणे बंधनकारक

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे दि. २८ जून २०२६ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेच्या पार्श्वभूमीवर महिला उमेदवारांच्या बुरखा, हिजाब आणि दुपट्टा वापराबाबत महत्त्वाचा खुलासा करण्यात आला आहे. यासंदर्भात राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे अधिकृत पत्र प्रसिद्ध करून परीक्षा केंद्रांवर चेहरा पूर्णपणे स्पष्ट दिसणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले. परिषदेकडे महिला उमेदवारांना बुरखा, हिजाब व दुपट्टा वापरण्यास परवानगी द्यावी, अशा मागण्यांचे ई-मेल प्राप्त झाले होते. त्यानंतर परीक्षेतील सुरक्षा, ओळख पडताळणी आणि पारदर्शकता लक्षात घेऊन हा खुलासा करण्यात आला आहे.

### पुण्यात रात्रभर पावसाची संततधार

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यात मंगळवार रात्रीपासून पावसाची संततधार सुरू आहे. यामुळे अनेक पुणे जिल्ह्यातील घाटमाथा आणि धरण परिसरात गेल्या २४ तासांत जोरदार पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान रात्रभर पावसामुळे पुण्यातील अनेक भागांत वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. पुणे उंड्री, कात्रज भागांत मागील एक तासापासून वाहतूक ठप्प झाली आहे तर मोहम्मदवाडी परिसरातही लोक वाहतूक कोंडीत अडकले आहेत. यामुळे शाळेत जाणरे विद्यार्थी, तसेच कामावर निघालेले नागरिकांना या वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसलेला आहे.

# नऱ्हे पोलिसांची मोठी कारवाई, दोघे जेरबंद

## गुजरातहून पुण्यात आणलेला २२.९१ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे पोलिसांनी गुटखा माफियांविरोधात मोठी आणि धडक कारवाई करत गुजरातमधून पुण्यात विक्रीसाठी आणण्यात आलेला तब्बल २२ लाख ९१ हजार ५३४ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पुणे शहरात सुरू असलेल्या गुटखा तस्करीच्या साखळीचा पर्दाफाश झाला असून पोलिसांकडून या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेतला जात आहे.




नऱ्हे पोलिस ठाण्याचे तपास पथक नियमित गस्त घालत असताना पोलिस अंमलदार देवा चव्हाण यांना गुजरातमधून आलेल्या एका ट्रॅव्हल्स बसमधून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक वर्षा देशमुख, पोलिस निरीक्षक (गुन्हे) ईश्वर चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे आणि त्यांच्या पथकाने तातडीने कारवाईची रणनीती आखली.

पोलिसांनी नवले पुलाखाली सापळा रचून संशयित ट्रॅव्हल्स बस अडवली. बसची कसून तपासणी केली असता चालक हबास मुबारक खान (वय ३४, रा. बाडमेर, राजस्थान) याच्या ताब्यातून विविध ब्रँडचा प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला. यामध्ये विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू, आरएमडी पान मसाला, तुळशी तंबाखू आणि गोवा गुटखा यांचा समावेश होता. या मालाची किंमत सुमारे ५ लाख ९० हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, हा माल स्वीकारण्यासाठी घटनास्थळी आलेल्या सोहेल अस्लम मुलाणी (वय २२, रा. गंजपेठ, पुणे) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी केदारीनगर परिसरातील एका गोदामावर छापा टाकला. या कारवाईत त्याच प्रकारचा आणखी १७ लाख ७३४ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

दोन्ही कारवायांमध्ये मिळून २२ लाख ९१ हजार ५३४ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात हा संपूर्ण माल गुजरातमधील अहमदाबाद येथून पुण्यात विक्रीसाठी आणण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींनी चौकशीदरम्यान माल गुजरातमधून आणल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

महाराष्ट्रात गुटखा आणि काही तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही अशा प्रकारे राज्याबाहेरून मालाची तस्करी करून त्याची पुणे आणि परिसरात विक्री केली जात असल्याचे या कारवाईतून समोर आले आहे. त्यामुळे या अवैध व्यवसायामागील आर्थिक साखळी, पुरवठादार, वितरक आणि विक्रेत्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढविली आहे.

या प्रकरणी नऱ्हे पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने अधिनियम तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे करीत आहेत.

ही कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलिस आयुक्त संजय दराडे, अपर पोलिस आयुक्त राजेश बनसोडे, पोलिस उपायुक्त सागर कवडे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त विजय कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत वरिष्ठ पोलिस निरीक्षक वर्षा देशमुख, पोलिस निरीक्षक (गुन्हे) ईश्वर चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे, किरण लिटे तसेच पोलिस अंमलदार देवा चव्हाण, सुनील चव्हाण, कार्तिक कोंडे, प्रणिल मेस्त्री, सुमित जगताप, राजू तोरे, नितीन वाघमारे आणि निलेश भोरडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पुणे पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात असून, आगामी काळात अशा प्रकारच्या अवैध साठेबाज आणि तस्करांविरोधात आणखी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## डोक्यात सिलेंडर घालून पत्नीचा खून; आरोपी पती फरार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील खराडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मंगळवारी मध्यरात्री घडलेल्या एका घटनेने खळबळ उडाली आहे. किरकोळ कारणावरून पतीने पत्नीच्या डोक्यात घरातील छोटा गॅस सिलेंडर मारल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. किरण जयराम बाबर (वय अंदाजे ३० ते ३२ वर्षे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. तर तिचा पती जयराम तोताराम बाबर हा खून करून पसार झाला आहे. खराडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघेही पती-पत्नी मूळचे मध्य प्रदेशातील रहिवासी असून खराडी परिसरातील एका लेबर कॅम्पमध्ये राहतात. उदरनिर्वाहासाठी ते कचरा गोळा करणाऱ्या करणाऱ्या गाडीवर काम करत होते. मंगळवारी मध्यरात्री दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर संतापाच्या भरात जयराम बाबर याने घरातील छोटा गॅस सिलेंडर उचलून पत्नी किरण हिच्या डोक्यात जोरदार मारला. या हल्ल्यात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने तिचा मृत्यू झाला.

## लग्न केतनसोबत... पण रात्रंदिवस कॉल्स चेतनला; सिया-चेतनची कॉल हिस्टरी चर्चेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील केतन अग्रवाल खून प्रकरणात नवे अन् धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. पोलिसांच्या तपासात हा अपघात नसून हत्या असल्याचं निष्पन्न झाल्यानंतर आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्या संबंधांबाबत अनेक माहिती समोर येत आहे. कॉल रेकॉर्ड्स आणि केतनच्या वडिलांनी केलेल्या दाव्यांमुळे या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे...केतन अग्रवालसोबत लग्न ठरल्यानंतरही सिया गोयल आणि चेतन चौधरी सतत संपर्कात असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. पोलिसांनी दोघांची कॉल हिस्ट्री तपासल्यानंतर गेल्या काही महिन्यांतील संवादाचे तपशील



उघड झाले आहेत. पोलिसांच्या तपासात समोर आलेल्या आकडेवारीनुसार मागील सहा महिन्यांत दोघांनी तब्बल २००० वेळा एकमेकांना फोन कॉल केलेत.. म्हणजेच दोघांचे दररोज सरासरी ११ ते १२ कॉल झालेत.. इतकच नाही तर दोघांनी तब्बल १४ हजार ८०० मिनिटे एकमेकांशी संवाद साधल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणावर केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनीही गंभीर आरोप केलेत. सिया गोयल आणि चेतन चौधरी यांचं अनेक वर्षांपासून अफेअर होतं.. केतनसोबत लग्न निश्चित झाल्यानंतरही सिया चेतनसोबत बाहेर गेली होती, असा आरोपही त्यांनी केलाय अग्रवाल आणि गोयल कुटुंबीयांची ३५ ते ४० वर्षे ओळख होती. त्यांच्यातील विश्वासामुळेच ही सोयरीक जुळली होती.. मात्र चेतन आणि सिया यांच्या विषयी समोर येत असलेली माहिती पाहता सिया चेतनच्या प्रेमात आकंठ बुडाली होती.. त्यामुळे तिला केतन सोबत लग्न करायचं नव्हतं.. तसं घरच्यांना सांगण्याची तिची हिंमत होत नव्हती.. आणि त्यामुळेच तिने केतनला ठार मारून तो पाय घसरून पडल्याचा बनाव केला होता... असं असलं तरीही या संपूर्ण प्रकरणात अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. पोलिसांकडून दोन्ही आरोपींची कसून चौकशी सुरू असून पुढील तपासातून आणखी कोणते धक्कादायक खुलासे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## प्रकाश वीर यांना राज्यस्तरीय 'विश्वकर्मा गुणवंत कामगार' पुरस्कार जाहीर



**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांमार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्काराची अंतिम यादी प्रसिद्ध झाली असून, मार्स इंटरनॅशनल इंडिया प्रा. लि., खेड सिटी, राजगुरूनगर (ता. खेड) येथे कंट्रोल असोसिएट म्हणून कार्यरत असलेल्या प्रकाश शरद वीर यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांपैकी कामगार क्षेत्रासह सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, क्रीडा, सांस्कृतिक, पर्यावरण तसेच इतर संबंधित क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. दिघी-पुणे येथील रहिवासी असलेले प्रकाश वीर हे कामगार संघटनेचे जनरल सेक्रेटरी असून ते एक कुशल तबलावादक आहेत. त्यांनी 'संघटन - नेतृत्व, हक्क, आणि संघर्षाची कहाणी' हे पुस्तक प्रकाशित केले आहे, तसेच मानवी हक्क संरक्षण व जागृती संस्थेमार्फत आयोजित विविध उपक्रमांमध्ये ते सक्रिय सहभाग घेत असतात. वृक्षारोपण, मतदार जनजागृती, रक्तदान शिबिरे तसेच इतर अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. कामगार कल्याण मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम यादीत राज्यभरातील ५१ गुणवंत कामगारांची निवड करण्यात आली आहे, या पुरस्कारामध्ये रु. २५,००० चे रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विविध स्तरांतून प्रकाश शरद वीर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ४० वर्षांनंतरही जपली समाजाशी नाळ

## माजी विद्यार्थ्यांकडून वृद्धाश्रमाला आरओ प्रकल्पाची भेट

- एकत्र येऊन समाजोपयोगी कामे करण्याची गरज : वनपरिमंडळ अधिकारी प्रमोद रासकर



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

शालेय शिक्षण पूर्ण होऊन चार दशके उलटून गेल्यानंतरही आपल्या जन्मभूमी, परिसर आणि समाजाशी असलेले नाते जपून समाजोपयोगी कार्यासाठी एकत्र येणे ही आजच्या काळाची मोठी गरज असल्याचे प्रतिपादन वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी प्रमोद रासकर यांनी केले. पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलच्या १९८६ सालच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत समर्पण वृद्धाश्रमाला जलशुद्धीकरण यंत्रणा (आरओ वॉटर फिल्टर प्लांट) भेट दिल्याच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

कवडीपाट येथील कदमवाकवस्ती परिसरातील समर्पण वृद्धाश्रमात आयोजित कार्यक्रमात रासकर यांच्या हस्ते आरओ प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी हभप सुशील महाराज काळभोर, विशाल गुजर, पुणे बार असोसिएशनचे माजी सचिव ॲड. राहुल झेंडे, समर्पण संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र कांबळे, सखाराम घाडगे, डॉ. लक्ष्मण मासाळ, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र बापू काळभोर यांच्यासह १९८६ च्या बॅचमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रमोद रासकर म्हणाले, "हा कार्यक्रम केवळ जलशुद्धीकरण यंत्रणेच्या लोकार्पणाचा नसून कृतज्ञता, सामाजिक बांधिलकी आणि संस्कारांचा संगम आहे. 'पाणी हेच जीवन' असे आपण म्हणतो; मात्र शुद्ध पाणी हे आरोग्यदायी जीवनाचे आधारस्तंभ आहे. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यामागील माजी विद्यार्थ्यांची भावना अत्यंत पवित्र आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन तुम्ही मानवसेवेच्या माध्यमातून ईश्वरसेवाच केली आहे."

ते पुढे म्हणाले की, शाळेतील मैत्री, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचे हे सुंदर उदाहरण असून अशा उपक्रमांतून नव्या पिढीला समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार योगदान देणे आवश्यक आहे.

कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र बापू काळभोर, ज्येष्ठ शिक्षिका कल्पना बोरकर, सूर्यकांत गवळी आणि डॉ. लक्ष्मण मासाळ यांनीही मनोगत व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र बापू काळभोर यांनी केले, तर सूत्रसंचालन शाहीर महेश खुळपे यांनी केले. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाजहितासाठी अशाच प्रकारच्या उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

### 'समर्पण'साठी माजी विद्यार्थ्यांचे समर्पण

पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलच्या १९८६ च्या बॅचने शिक्षणानंतर तब्बल ४० वर्षांनी पुन्हा एकत्र येत वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आरओ जलशुद्धीकरण प्रकल्प उभारला. सामाजिक जाणीव आणि कृतज्ञतेतून साकारलेला हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला असून माजी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श मानला जात आहे.

## जगातील सर्वात मोठ्या ५२११ किलो पारद शिवलिंगाची भव्य प्राणप्रतिष्ठा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्री साई शिव गंगा धाम, हरिद्वार येथे जगातील सर्वात मोठ्या ५२११ किलो वजनाच्या पारद शिवलिंगाची तीन दिवसीय भव्य प्राणप्रतिष्ठा भक्तिभाव, वैदिक मंत्रोच्चार आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाली. या ऐतिहासिक सोहळ्यास देशभरातील दोन हजारांहून अधिक भाविक, संत-महंत, साधक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून साक्षीदार होण्याचा मान मिळविला. या भव्य पारद शिवलिंगाची निर्मिती ध्यान गुरु रघुनाथ गुरुजी यांनी सुमारे दहा वर्षांच्या अखंड साधना, संशोधन आणि पारद विज्ञानाच्या सखोल अभ्यासातून केली आहे. शिवलिंगाच्या निर्मितीत पारा, चांदी, सोने तसेच १०८ प्रकारच्या औषधी वनस्पतींच्या अर्कांचा वापर करण्यात आला आहे. आध्यात्मिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, हे जगातील सर्वात मोठे पारद शिवलिंग असून भारतीय अध्यात्म, ध्यान परंपरा आणि पारद विज्ञानाचे अद्वितीय प्रतीक मानले जात आहे.

# एस.टी. कामगारांना चांगले वेतन आणि सुविधा द्या



## एसटी कर्मचाऱ्यांची द्वारसभा आंदोलनातून मागणी

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कामगारांच्या रेंगाळलेल्या आर्थिक बाबतच्या मागण्या तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, यासाठी महाराष्ट्र एसटी कर्मचाऱ्यांची संयुक्त कृती समिती आक्रमक झाली असून राजगुरूनगर येथे द्वारसभा आंदोलन झाले. एस. टी. कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व सुविधा व इतर मागण्याही यावेळी मांडण्यात आल्या.

या द्वारसभेला गुलाब तिटकारे, सोमनाथ काळे, अजिंक्य फलके, प्रशांत होले, प्रदीप गुट्टे, अमित जगताप, गणेश सांडभोर, मोहन गोपनारायण, विष्णू राठोड, माऊली करंडे, नारायण कंगणे, स्वाती बिराजदार, अर्चना शिंदे, विजया बगाटे, कामगार संघटना अध्यक्ष गजानन सांडभोर, सचिव दत्तात्रय गभाले आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सचिव दत्तात्रय गभाले म्हणाले की, सन २०१६ पासून ३ टक्के वार्षिक वेतनवाढ लागू करण्यात यावी. घरभाडे भत्ता १० टक्के, २० टक्के व ३० टक्के प्रमाणे लागू करण्यात यावा. महागाई भत्त्याची संपूर्ण थकबाकी अदा करावी. एस.टी. कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व सुविधा द्याव्यात आदी मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी हि द्वारसभा महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी कृती समितीच्या वतीने घेण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### हवा गुणवत्ता व्यवस्थापनासाठी आधुनिक डिसिजन सपोर्ट सिस्टिम

पुणे (आरंभ पर्व) : सीआयआय क्लीनर एअर बेटर लाईफ (सीएबीएल) तर्फे व पुणे महानगरपालिका (पीएमसी) आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ हवेसाठी एक बहुभागधारक बैठकीचे आज आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी ,सीआयआय क्लीनर एअर बेटर लाईफ उपक्रमाच्या अध्यक्ष श्वेता आर्या आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सीएबीएल फोरम तर्फे पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी डिसिजन सपोर्ट सिस्टिम (डीएसएस) या अभिनव प्लॅटफॉर्मचे उद्‌घाटन करण्यात आले. हा अशा प्रकारचा पहिलाच प्लॅटफॉर्म असून डेटा-आधारित हवेच्या गुणवत्ता व्यवस्थापनासाठी व निर्णय प्रक्रिया सक्षम करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आला आहे. या प्लॅटफॉर्ममुळे शहर प्रशासनाला हवेच्या गुणवत्तेशी संबंधित माहिती अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार असून त्याचे विश्लेषण आणि वापर करणे सुलभ होईल. त्यामुळे अधिक प्रदूषित भाग ओळखणे (पोल्युशन्स हॉटस्पॉटस्), विविध उपाय योजनांचे मूल्यांकन करण्यास तसेच नियोजन आणि अमंलबजावणी प्रक्रिया अधिक बळकट करण्यास मदत होईल.



### माजी सरपंच गेनदेव आटोळे यांनी केला भाजपा प्रवेश

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील रावणगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गेनदेव आटोळे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्ते सह भारतीय जनता पार्टीचे दौंड तालुक्याचे आमदारअँड राहुल कुल यांच्या उपस्थितीमध्ये पक्षप्रवेश केला,गेनदेव आटोळे यांनी त्यांच्या उपसरपंच तसेच सरपंच काळामध्ये विविध विकास कामे मार्गी लावले होते, पंचायत समितीचे माजी सदस्य मानसिंग गाढवे, भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चाचे अध्यक्ष अरुण आटोळे, अँड बापूराव भागवत, भीमा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक संपत आबा आटोळे, लक्ष्मण रांधवन रावण गावचे माजी उपसरपंच अशोक आटोळे, सोसायटीचे माजी चेअरमन मुगाजी आटोळे, माजी उपसरपंच संग्राम भोपाळ, राजेंद्र आटोळे, दादासाहेब धायतोंडे, माजी चेरमन बाळासाहेब आटोळे, ग्रामपंचायत चे माजी सदस्य विकास आटोळे, अक्षय पानसरे,सुजित सांगळे, राज योग आटोळे, किरण काळे, निलेश पोमणे,संजय गाढवे, अजित आटोळे आधी यावेळी उपस्थित होते, आरोग्य दूत आमदार अँड राहुल दादा कुल यांच्या मार्गदर्शनाखाली रावणगाव गावाचा तसेच ग्रामस्थांचा विविध योजना राहून विकास करण्याचे काम करणार असल्याची माहिती गेनदेव आटोळे यांनी दिले.

### डॉ. के. एच. संचेती मेडी-रत्न पुरस्कार डॉ. कल्याण गंगवाल यांना जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : मेडी-जैन डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या 'डॉ. के. एच. संचेती मेडी-रत्न पुरस्कार' या पुरस्काराचा पहिला मान ज्येष्ठ फिजिशियन डॉ. कल्याण गंगवाल यांना जाहीर करण्यात आला आहे. मेडी-जैन डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. ज्योती संघवी, डॉ. जिग्नेश तासवाला आणि डॉ. पराग जैन यांनी याबाबत माहिती दिली. वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्व डॉ. के. एच. संचेती यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार सुरू करण्यात आला असून, आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत डॉ. कल्याण गंगवाल यांची पहिल्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. अनेक दशकांपासून त्यांनी रुग्णसेवा, वैद्यकीय क्षेत्रातील प्राविण्य आणि आरोग्य व्यवस्थेच्या उभारणीत दिलेले योगदान उल्लेखनीय मानले जाते. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ९.०० वा संचेती हॉस्पिटल, छत्रपती शिवाजीनगर पुणे येथे करण्यात आले आहे.

# पांढरेवाडीत एकल महिला दिन साजरा



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

पांढरेवाडीत ग्रामपंचायतीच्या वतीने एकल महिला दिवस साजरा करण्यात आला.सर्वप्रथम महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सौ. नीता कोंडे व उपसरपंच पूनम चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एकल महिलांना हळदी-कुंकु लावून व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. महात्मा फुले यांच्या 200व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचा प्रचार प्रसार व सन्मान व्हावा याकरिता तसेच महात्मा फुले यांनी विधवांसाठी केलेल्या कार्याचे स्मरण महाराष्ट्र शासनाच्या बालविकास विभागाने 23जून हा आतंरराष्ट्रीय विधवा दिवस हा एकल महिला दिवस म्हणून साजरा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.त्यानुसार पांढरेवाडी ग्रामपंचायतीने हा उपक्रम घेतला. बचतगटांनी बनवलेल्या वस्तुंचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी बोलताना सरपंच नीता कोंडे म्हणाल्या की, विधवा महिलांनासुद्धा सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे,विधवांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे.यापुढील काळात प्रत्येक एकल महिलेला सन्मानाचीच वागणूक मिळाली पाहिजे. तसेच ग्रामपंचायत अधिकारी स्वाती लोंढे म्हणाल्या की,एकल महिलांसाठी सर्व शासकीय योजना प्रभावीपणे राबवून एकल महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार आहोत.

यावेळी उपसरपंच पूनम चव्हाण,अलका गायकवाड,अमिना सय्यद,दिपाली चव्हाण,मंगल जगताप,वंदना झगडे,अमृता निंबाळकर,तृप्ती निबांळकर तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आभार स्वाती शितोळे यांनी मानले.

## एकल महिला धोरणासाठी कार्यशाळा संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित व इतर एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करत असून, त्याअनुषंगाने "एकल महिला दिवस" निमित्त जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद, पुणे येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेस महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती अंकिताताई पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) आनंद खंडागळे, जिल्हा परिविक्षा अधिकारी दत्तात्रय कुटे तसेच एकल महिला, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासक उपस्थित होते. यावेळी रोजगाराच्या संधी, मालमत्तेचा हक्क, अपत्यांचे शिक्षण, निवारा, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत सुधारणा, नवीन योजनांची गरज, कायदेशीर अडचणी, न्यायालयीन प्रक्रियेतील सुधारणा तसेच महिलांची सुरक्षा व सहभाग वाढविण्याबाबत सूचना व अभिप्राय नोंदविण्यात आले.

## ऍल्पेनलीबे आणि स्विगीने सुरू केले 'स्वीटेस्ट सिटी चॅलेंज'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

परफेटी वॅन मेल इंडियाचा प्रसिद्ध ब्रँड ऍल्पेनलीबेने भारताचे आघाडीचे मागणीनुसार डिलिव्हरीचा असलेला प्लॅटफॉर्म 'स्विगी'सोबत (स्विगी लिमिटेड, NSE: SWIGGY / BSE: 544285) भागीदारी केली आहे. या दोन्ही आघाडीच्या कंपन्यांनी एकत्र येत ऍल्पेनलीबे स्वीटेस्ट सिटी चॅलेंज सुरू केले आहे, आजच्या आधुनिक आणि वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा हे आपले डिलिव्हरी पार्टनर्स आहेत, जे दररोज शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन अविरत सेवा देतात, याच भावनेला आणि त्यांच्या कष्टाला एक मानाचा मुजरा देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हे चॅलेंज पुणे, मुंबई, बेंगळुरू, कोलकाता, चेन्नई आणि दिल्लीसह भारतातील 20 हून अधिक शहरांमध्ये सुरू होणार आहे. अशा प्रकारचा हा एक आगळावेगळा उपक्रम असून, याद्वारे शहराशहरांमधील कोट्यवधी ग्राहकांना एक सुंदर आवाहन करण्यात आले आहे. ऑर्डर स्वीकारताना आपल्या डिलिव्हरी पार्टनर्सप्रती कृतज्ञता, आपुलकी आणि आदराची एक छोटीशी भावना व्यक्त करण्यासाठी हे चॅलेंज ग्राहकांना प्रेरित करते. ऍल्पेनलीबेने जवळपास 28,000 डिलिव्हरी पार्टनर्सच्या माध्यमातून केलेल्या त्यांच्या ताज्या 'इंडियाज स्वीटनेस रिपोर्ट' सर्वेक्षणातून एक महत्त्वाची गोष्ट समोर आणली आहे. या सर्वेक्षणात डिलिव्हरी पार्टनर्सनी सांगितले की, दर 5 पैकी जवळपास 2 प्रसंगांमध्ये त्यांना ग्राहकांकडून मिळालेला अनुभव सरासरीपेक्षा कमी दर्जाचा होता, तसेच दर 4 पैकी 1 डिलिव्हरी अशी असते, जिथे ग्राहकाकडून स्वागत किंवा साधी दादही मिळत नाही.

# रॅली रेसिंगमध्ये भारताची दमदार झेप

## हिरो मोटोस्पोर्ट्स टीम रॅलीचा दशकपूर्ती सोहळा




### साताऱ्याचा श्लोक घोरपडे हिरो टीममध्ये

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील १८ वर्षीय श्लोक घोरपडे याचा हिरो मोटोस्पोर्ट्स टीम रॅलीमध्ये अधिकृत समावेश करण्यात आला. राष्ट्रीय सुपरक्रॉस स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या श्लोकने अनेक विजेतेपदे पटकावत देशातील सर्वात वेगवान युवा रायडर म्हणून ओळख निर्माण केली आहे. आता तो जागतिक विजेता रॉस ब्रँच यांच्यासह प्रशिक्षण घेणार असून भविष्यातील डकार रॅलीसाठी त्याची तयारी सुरू झाली आहे.

**जयपूर (दै. आरंभ पर्व)**

जागतिक रॅली रेसिंगच्या मंचावर भारताचा झेंडा अभिमानाने फडकावणाऱ्या हिरो मोटोस्पोर्ट्स टीम रॅलीने आपल्या यशस्वी प्रवासाची दहा वर्षे पूर्ण करत नवे पर्व सुरू केले आहे. जयपूर येथील हिरो मोटोकॉर्पच्या अत्याधुनिक सेंटर फॉर इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित भव्य सोहळ्यात टीमच्या दशकभराच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. यावेळी कंपनीने भविष्यातील रॅली रेसिंगसाठी तीन महत्त्वपूर्ण धोरणात्मक उपक्रमांची घोषणा केली. या कार्यक्रमात २०२४ एफआयएम वर्ल्ड रॅली-रेड चॅम्पियन रॉस ब्रँच, नाचो कॉर्नेजो, मायकेल डोर्टी, भारतातील आघाडीचा रायडर श्लोक घोरपडे आणि देशातील पहिली व्यावसायिक महिला बाइकर सौम्या मोक्षा चौधरी यांच्यासह मोटरस्पोर्ट्स क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. जागतिक रॅली रेसिंगमधील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धा मानल्या जाणाऱ्या डकार रॅलीचे आयोजक असलेल्या ॲमॉरी स्पोर्ट ऑर्गनायझेशन (एएसओ) सोबतची भागीदारी हिरो मोटोकॉर्पने आणखी पाच वर्षांसाठी वाढवली आहे. या करारामुळे जागतिक स्तरावर रॅली-रेड स्पर्धांचा विस्तार आणि नवोदित खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यास मोठी चालना मिळणार आहे. भारतातील युवा ऑफ-रोड रेसिंग प्रतिभेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हिरो मोटोकॉर्पने 'इंडियाज नेक्स्ट डकार हिरो' (आयएनडीएच) हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत देशभरातील प्रतिभावान रायडर्सची निवड करून त्यांना दोन ते तीन वर्षांचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये रॅली रेसिंगचे तंत्र, नेव्हिगेशन, शारीरिक क्षमता आणि सहनशीलता यांवर विशेष भर दिला जाणार आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. २४ जून २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे




### जामको इंटिरिअर्सने पुणे सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन केले

पुणे (आरंभ पर्व) : सात दशकांहून अधिक काळाचा अभियांत्रिकी वारसा असलेली आणि विमान कॅबिन इंटिरिअर्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी जामको इंटिरिअर्सने आज भारतातील पुणे येथे आपल्या अगदी नवीन सेंटर ऑफ एक्सलन्स चे उद्घाटन केले. ही अभियांत्रिकी सुविधा जामको इंटिरिअर्सच्या जागतिक विस्तार धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरते आणि भारताला तिच्या जगभरातील अभियांत्रिकी नेटवर्कचा एक प्रमुख आधारस्तंभ बनवते. देशातील सर्वाधिक विकसित उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) आणि अभियांत्रिकी केंद्रांपैकी एका ठिकाणी उभारण्यात आलेली ही सुविधा महाराष्ट्रातील एरोस्पेस आणि प्रगत अभियांत्रिकी परिसंस्थेच्या सातत्यपूर्ण विकासाला हातभार लावेल. हे सेंटर ऑफ एक्सलन्स संकल्पना विकास, प्रणाली रचना, सविस्तर डिझाइन, प्रमाणन सहाय्य, ड्रॉइंग रिलीज आणि कॉन्फिगरेशन नियंत्रण यांचा समावेश असलेल्या विमान कॅबिनच्या संपूर्ण उत्पादन अभियांत्रिकीची जबाबदारी हाती घेईल. हे केवळ सहाय्यक किंवा आउटसोर्सिंग कार्य नाही; ते संपूर्ण उत्पादन मालकीचे प्रतिनिधित्व करते आणि जामको इंटिरिअर्सच्या जागतिक अभियांत्रिकी संघटनेत अखंडपणे समाविष्ट आहे. हे केंद्र महाराष्ट्रातील कुशल अभियांत्रिकी प्रतिभांना जागतिक स्तरावर प्रमाणित एरोस्पेस कार्यक्रम तसेच प्रगत उत्पादन विकास उपक्रमांमध्ये थेट सहभाग नोंदवून योगदान देण्याची संधी प्रदान करेल.

### राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी बागडे यांची निवड



नागपूर (आरंभ पर्व) : पत्रकारिता, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार तसेच वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या न्यायहक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ज्येष्ठ पत्रकार, लेखक व सामाजिक विश्लेषक प्रवीण मोरेश्वर बागडे (नागपूर) यांची “राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार-2026” साठी निवड करण्यात आली आहे. आंबेडकरी विचारसरणीला वाहिलेल्या दैनिक निळे प्रतीकच्या 17 व्या वर्धापन दिनानिमित्त हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक, पत्रकारिता आणि समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

## सुमीत इंडस्ट्रीजची १९९.७५ कोटींच्या राइट्स इश्यूची घोषणा

Sumeet INDUSTRIES LIMITED

- क्षमता विस्तार, कर्जफेड आणि सौर प्रकल्पासाठी निधी उभारणार

**सुरत (दै. आरंभ पर्व)**

एकात्मिक पॉलिस्टर उत्पादन क्षेत्रातील आघाडीची कंपनी सुमीत इंडस्ट्रीज लिमिटेडने व्यवसाय विस्तार आणि आर्थिक बळकटीसाठी १९९.७५ कोटी रुपयांच्या राइट्स इश्यूची घोषणा केली आहे. पात्र भागधारकांसाठी आणण्यात आलेल्या या इश्यूमधून उभारण्यात येणारा निधी उत्पादन क्षमता वाढ, कार्यकारी भांडवल मजबूत करणे, कर्जफेड आणि सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी वापरण्यात येणार आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने १६.८४ कोटी पूर्णतः भरलेल्या इक्विटी समभागांच्या माध्यमातून १९९.७५ कोटी रुपये उभारण्यास मंजुरी दिली आहे. प्रति समभाग ११.८६ रुपये या दराने हा इश्यू उपलब्ध असून प्रत्येक २५ समभागांमागे ८ राइट्स समभाग देण्यात येणार आहेत. रेकॉर्ड दिनांक १२ जून २०२६ असून इश्यू २२ जूनपासून खुला झाला आहे. हक्क हस्तांतरणाची अंतिम तारीख १५ जुलै तर इश्यू २० जुलै २०२६ रोजी बंद होणार आहे.

राइट्स इश्यूमधून मिळणाऱ्या निधीपैकी सुमारे ४९.९० कोटी रुपये नकोडा लिमिटेडकडून अधिग्रहित करण्यात आलेल्या १.४० लाख टन वार्षिक क्षमतेच्या पॉलिस्टर चिप्स प्रकल्पाच्या एकत्रीकरणासाठी खर्च करण्यात येणार आहेत. सुरत येथील या प्रकल्पासाठी एकूण ९० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून उर्वरित निधी अंतर्गत स्त्रोतांतून उभारला जाणार आहे. हा प्रकल्प आर्थिक वर्ष २०२७-२८ च्या पहिल्या तिमाहीत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. निव्वळ उभारलेल्या निधीपैकी १०० कोटी रुपये कार्यकारी भांडवलासाठी, ४९.९० कोटी रुपये नकोडा मालमत्तेच्या एकत्रीकरणासाठी, २३ कोटी रुपये कर्जफेडीसाठी आणि २२ कोटी रुपये ६.५ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी खर्च करण्यात येणार आहेत.

## एकात्मिक किनारी सुरक्षा कायदा लागू करण्याची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर देशातील किनारी सुरक्षेबाबत विविध उपाययोजना करण्यात आल्या असल्या तरी माहिती देवाणघेवाणीतील विलंब, विविध सुरक्षा यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव आणि किनारी भागातील अपुरी देखरेख या समस्या अद्याप कायम असल्याचा दावा करत नागरिक सोशल फाउंडेशनने केंद्र व राज्य सरकारकडे "युनिफाइड कोस्टल सिक्युरिटी ॲक्ट" (Unified Coastal Security Act) लागू करण्याची मागणी केली आहे. अशी माहिती न नागरिक सोशल फाउंडेशन चे ॲड .रोहन कानिटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला नागरिक सोशल फाउंडेशनचे विश्वस्त प्रीतम थोरवे, ॲड .सर्वेश मेहेंदळे आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ॲड . रोहन कानिटकर यांनी सांगितले की, २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात १६६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही किनारी सुरक्षेतील धोके कायम आहेत. दुसरीकडे, विकसित



होत असलेल्या वाढवन बंदर प्रकल्पामुळे महाराष्ट्राचे सामरिक आणि आर्थिक महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. वाढवन बंदर कार्यान्वित झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय मालवाहतूक, कंटेनर वाहतूक, सागरी व्यापार आणि किनारी आर्थिक क्रियाकलापांमध्ये मोठी वाढ अपेक्षित असल्याने सुरक्षा व्यवस्थाही अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अमेरिका, सिंगापूर आणि इस्रायलसारख्या देशांनी आधुनिक मेरिटाईम इंटेलिजन्स व कोस्टल सर्व्हेलन्स प्रणालीच्या माध्यमातून किनारी सुरक्षा मजबूत केली आहे. तसेच गुजरात, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांनीही विविध यशस्वी किनारी सुरक्षा उपक्रम राबविले आहेत. त्याच धर्तीवर भारतात राष्ट्रीय स्तरावर एकात्मिक किनारी सुरक्षा नेटवर्क उभारण्याची गरज असल्याचे फाउंडेशनने स्पष्ट केले. राज्य शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये महाराष्ट्र किनारी सुरक्षा प्राधिकरणाची स्थापना, संपूर्ण किनारपट्टीवर रडार, ड्रोन, AIS, GPS, उपग्रह व कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आधुनिक निगराणी प्रणाली विकसित करणे तसेच वाढवन बंदर, जेएनपीटी, मुंबई हाय, ओएनजीसी प्रतिष्ठाने आणि नौदल तळांसारख्या सामरिक सुविधांच्या संरक्षणासाठी बहुस्तरीय सुरक्षा आराखडा राबविण्याचा समावेश आहे. केंद्र शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये "युनिफाइड कोस्टल सिक्युरिटी ॲक्ट" लागू करून भारतीय नौदल, तटरक्षक दल, मरीन पोलीस, सीमाशुल्क विभाग आणि बंदर प्राधिकरण यांच्यात एकात्मिक कायदेशीर चौकट निर्माण करणे, सर्व मासेमारी नौकांसाठी GPS, AIS आणि आधार-संलग्न बायोमेट्रिक नोंदणी बंधनकारक करणे तसेच संवेदनशील किनारी भागांना "हाय-सिक्युरिटी कोस्टल झोन" घोषित करून सागरी गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षा आणि विशेष जलदगती न्यायालयांची स्थापना करणे यांचा समावेश आहे.

यावेळी भारतातील वाढते समुद्री सुरक्षा धोके, कोस्टल सिक्युरिटी व्यवस्थेतील त्रुटी आणि "युनिफाइड कोस्टल सिक्युरिटी सिस्टिम"ची गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. वाढता समुद्री व्यापार, मोठे बंदर प्रकल्प, समुद्रमार्गे होणारी तस्करी, घुसखोरी आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील संभाव्य धोके लक्षात घेता केंद्र व राज्य शासनाने तातडीने एकात्मिक आणि रिअल-टाईम किनारी सुरक्षा नेटवर्क उभारावे, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशनने केली आहे.

## ग्रामपंचायत शिर्सुफळ, ता. बारामती, जि. पुणे

बी-१ पेपर नोटीस क्रमांक-२ सन २०२६-२७

ग्रामपंचायत शिर्सुफळ, ता. बारामती, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत शिर्सुफळ, ता. बारामती, जि.पुणे यांच्याकडून दिनांक २४/०६/२०२९ ते दिनांक ३०/०६/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक २४/०६/२०२९ ते दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे शिर्सुफळ येथील ओढा खोलीकरण करणे. | २५११८५/- | दिनांक २४/०६/२०२९ ते दिनांक ३०/०६/२०२६ | २३६/- | सूट-सु.बे.अ. |
| २ | मौजे शिर्सुफळ येथील शिरसाई ओढा डबर पंचिंग करणे. | ४०११००/- | | २३६/- | सूट-सु.बे.अ. |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत शिर्सुफळ बँक ऑफ बडोदा बँक शिर्सुफळ शाखा खाते क्र. २०७१०१०००००८०० वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत शिर्सुफळ ग्रामनिधी खाते बँक ऑफ बडोदा बँक शिर्सुफळ शाखा खाते क्र. २०७१०१०००००८०० च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत शिर्सुफळ यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत शिर्सुफळ, ता. बारामती, जि. पुणे

## समरसता लोककला संमेलनचे पुण्यात आयोजन

### संमेलनाच्या अध्यक्षपदी पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची निवड




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य समरसता साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ‘समरसता लोककला संमेलन २०२६’ चे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी लोककलावंत पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची निवड करण्यात आली असून हे संमेलन २८ जून २०२६ रोजी होणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी धनंजय खुडे, विलास लांडगे, विजय मोरे, सुनील खंडाळे, रेश्मा मुसळे-परीतेकर, विकास माने, बाळासाहेब मालुसकर, जितेंद्र वाईकर, उपस्थित होते. समरसता लोककला संमेलन २०२६ चे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर स्वागताध्यक्ष भाजपचे पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे आहेत.

या संमेलनात सकाळी 8 वाजता पुणे महानगरपालिका ते बालगंधर्व रंगमंदिर अशी लोककलावंतांची भव्य लोककला दिंडी निघणार आहे, त्यांचे उद्घाटन महापौर मंजूषा नागपुरे यांच्या हस्ते होईल, या दिंडीत गोंधळी, वासुदेव, शाहिर, भारूड, लावणी, दशावतार, आदिवासी नृत्य, झाडीपटी यांसारख्या सुमारे २५० लोककलावंतांचा सहभाग असणार आहे.

दुर्मीळ लोकवाद्यांचे प्रदर्शन बालगंधर्व रंगमंदिर, कला दालन येथे असणार आहे त्यांचे उद्घाटन सकाळी 9.30 वाजता राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे.

## ॲक्सिस मॅक्स लाईफचा दावा निकाली काढण्याचा विक्रमी दर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेडने (पूर्वाश्रमीची मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड) आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वैयक्तिक मृत्यू दाव्यांच्या निकाली काढण्याच्या प्रमाणात विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. कंपनीने यावर्षी २०,५२९ वैयक्तिक मृत्यू दावे मंजूर करत तब्बल १,६४१ कोटी रुपयांची रक्कम वितरित केली आहे. यामुळे कंपनीचा वैयक्तिक मृत्यू दावा निकाली काढण्याचा दर ९९.८ टक्क्यांवर पोहोचला असून, हा आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर आहे. मागील पाच वर्षांमध्ये कंपनीच्या दावा निकाली काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२१ -२२ मध्ये हा दर ९९.३४ टक्के होता, जो २०२२ -२३ मध्ये ९९.५१ टक्के, २०२३ -२४ मध्ये ९९.६५ टक्के, २०२४-२५ मध्ये ९९.७ टक्के आणि २०२५-२६ मध्ये ९९.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. याचाच अर्थ आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील ९९.३४ पासून वाढत आता ९९.८ टक्के हा नवीन बेंचमार्क स्थापित झाला आहे. कंपनीच्या स्थापनेपासून आजपर्यंत एकूण २,४३,५२४ पॉलिसींवरील मृत्यू दाव्यांपोटी ११,७७२.२१ कोटी रुपयांहून अधिक रक्कम अदा करण्यात आली आहे.

AXIS MAX LIFE INSURANCE

## जाहीर नोटीस

मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...

आरटीएस/अपील नं. २३०/२०२५

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज.मु.
सचिन रामनाथ कासार
विरुध्द
रेस्पॉइंट
भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर

प्रति,

१) अनिता राजेंद्र माहुरकर रा.घ.नं.२५५३, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर
२) सुरेखा सुहास रामचंद्रे रा.सराफ कटटा, मु.पो. सांगली, जि. सांगली
३) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण
४) निर्मला रमेश पानपट
५) रंजना प्रकाश रासने
नं.३ ते ५ रा. दगडे गल्ली, मु.पो. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि.बीड
६) भारती रमेश थिटे रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे.
७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
८) सिंधुबाई भोपाळराव बागवडे रा. फलॅट नं.९, फेज नं.३, वर्धमान कॉलनी, कोल्हापुर रोड, सांगली, जि. सांगली

ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस /विलंब माफी अर्ज नं. १११/२०२४ दि.११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरुध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुम्हा उत्तरार्थी पक्षकार म्हणुन सामील असुन तुम्हांस तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवुन देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही.

त्याअर्थी तुंम्हास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दिनांक २९/०६/२०२६ रोजी दु.३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असुन सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसुर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आज दिनांक ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहि व कार्यालयीन शिक्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी
अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...

आरटीएस/अपील नं. २२९/२०२५

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज.मु.
सचिन रामनाथ कासार
विरुध्द
रेस्पॉइंट
भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर

प्रति,

१) अनिता राजेंद्र माहुरकर रा.घ.नं. २५५३, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर
२) सुरेखा सुहास रामचंद्रे रा. सराफ कट्टा, मु.पो. सांगली, जि. सांगली
३) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण
४) निर्मला रमेश पानपट
५) रंजना प्रकाश रासने नं.४ ते ६ रा. दगडे गल्ली, मु.पो. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि.बीड
६) भारती रमेश थिटे रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे.
७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
८) सिंधुबाई भोपाळराव बागवडे रा. फलॅट नं.९, फेज नं.३, वर्धमान कॉलनी, कोल्हापुर रोड, सांगली, जि. सांगली

ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं.१०८/२०२४ दि.११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरुध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुंम्हा उत्तरार्थी पक्षकार म्हणुन सामील असुन तुम्हांस तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवुन देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही. त्याअर्थी तुंम्हास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दिनांक २९/०६/२०२६ रोजी दु.३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असुन सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसुर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आज दिनांक ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहि व कार्यालयीन शिक्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी
अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...

आरटीएस/अपील नं. २२८/२०२५

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज.मु.
सचिन रामनाथ कासार
विरुध्द
रेस्पॉइंट
भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर

प्रति,

१) अनिता राजेंद्र माहुरकर रा.घ.नं.२५५३, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर
२) सुरेखा सुहास रामचंद्रे
३) सतिष वसंत रामचंद्रे अ.नं.२ व ३रा. सराफ कटटा, मु.पो. सांगली, जि. सांगली
४) निर्मला रमेश पानपट
५) रंजना प्रकाश रासने
नं.३ व ४ रा. दगडे गल्ली, मु.पो. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि.बीड
६) भारती रमेश थिटे रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे.
७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
८) सिंधुबाई भोपाळराव बागवडे रा.फलॅट नं.९, फेज नं.३, वर्धमान कॉलनी, कोल्हापुर रोड, सांगली, जि. सांगली

ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं.१०९/२०२४ दि.११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरुध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुंम्हा उत्तरार्थी पक्षकार म्हणुन सामील असुन तुम्हांस तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवुन देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही.

त्याअर्थी तुम्हांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दिनांक २९/०६/२०२६ रोजी दु.३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असुन सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसुर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आज दिनांक ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहि व कार्यालयीन शिक्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी
अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...

आरटीएस/अपील नं. २२७/२०२५

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज.मु.
सचिन रामनाथ कासार
विरुध्द
रेस्पॉइंट
भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर

प्रति,

१) प्रमोद उध्दव रासने
२) हेमा अनिल रासने
३) ऐश्वर्या अनिल रासने
४) श्रावणी अनिल रासने
नं.१ ते ४ रा.श्रीराम कॉलनी, आरती हॉटेल मागे, नगर-पुणे रोड, केडगांव, अहिल्यानगर
५) प्रविण मोतीलाल डोरले रा. बोरीवली, मुंबई
६) सुरेखा सुहास रामचंद्रे रा. सराफ कटटा, मु.पो.सांगली, जि. सांगली.
७) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण
८) निर्मला रमेश पानपट
९) रंजना प्रकाश रासने
नं. ७ ते ९ रा. दगडे गल्ली, मु.पो. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि.बीड
१०) भारती रमेश थिटे रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे.
११) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
१२) सिंधुबाई भोपाळराव बागवडे रा.फलॅट नं.९, फेज नं.३, वर्धमान कॉलनी, कोल्हापुर रोड, सांगली, जि. सांगली

ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं. ११०/२०२४ दि. ११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरुध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुंम्हा उत्तरार्थी पक्षकार म्हणुन सामील असुन तुम्हांस तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवुन देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही.

त्याअर्थी तुंम्हास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दिनांक २९/०६/२०२६ रोजी दु.३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असुन सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसुर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आज दिनांक ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहि व कार्यालयीन शिक्यानिशी दिली असे

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी
अहिल्यानगर

## थोडक्यात पण महत्वाचे

### मेंटेनन्स टाळण्याचा अधिकार सदस्यांना नाही : न्यायालयाचे स्पष्ट निरीक्षण



मुंबई (आरंभ पर्व) : गृहनिर्माण सोसायटीतील सदस्यांना मासिक देखभाल (मेंटेनन्स) शुल्क भरणे बंधनकारक असून, कोणत्याही कारणास्तव ते टाळण्याचा अधिकार सदस्यांना नसल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. सोसायटीच्या दैनंदिन कारभारासाठी, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, वीज, पाणीपुरवठा, लिफ्ट देखभाल आणि इतर सामायिक सुविधांच्या खर्चासाठी मेंटेनन्स शुल्क अत्यावश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने नमूद केले की, सोसायटीच्या व्यवस्थापनाबाबत एखाद्या सदस्याची तक्रार किंवा आक्षेप असला तरी त्याला मेंटेनन्स भरणे थांबविण्याचा अधिकार मिळत नाही. अशा तक्रारी संबंधित सक्षम प्राधिकरण, सहकारी विभाग किंवा न्यायालयासमोर मांडता येतात; मात्र शुल्क न भरणे हा पर्याय नाही. यावेळी न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, काही सदस्य जाणूनबुजून मेंटेनन्स थकवतात, त्यामुळे सोसायटीच्या आर्थिक व्यवस्थेवर परिणाम होतो. परिणामी इतर सदस्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडतो आणि आवश्यक सेवा पुरविण्यात अडचणी निर्माण होतात. तज्ज्ञांच्या मते, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम तसेच गृहनिर्माण सोसायटींच्या नियमांनुसार सर्व सदस्यांनी वेळेवर देखभाल शुल्क भरणे आवश्यक आहे. शुल्काबाबत वाद असल्यास तो कायदेशीर मार्गाने सोडवावा, परंतु मेंटेनन्स रोखणे योग्य नाही. या निर्णयामुळे राज्यातील हजारो गृहनिर्माण सोसायट्यांमधील थकीत मेंटेनन्सच्या प्रश्नावर स्पष्टता आली असून, सदस्यांनी आपली आर्थिक जबाबदारी वेळेत पार पाडावी, असा संदेश न्यायालयाच्या निरीक्षणातून देण्यात आला आहे.

# पुण्यातील लाखो नागरिकांची माहिती गायब!

## महापालिकेच्या सर्व्हरमधून 'हार्ड डिस्क' चोरली...



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या मुख्य इमारतीच्या सर्व्हर रूममधून ४ टीबी क्षमतेची हार्ड डिस्कची चोरी झाल्याची बाब समोर आली आहे. ठेकेदारी पद्धतीने सर्व्हरचे काम करणाऱ्या व्यक्तीनेच ही हार्ड डिस्क गायब केल्याचे समोर आले असून, यामुळे डेटासुरक्षा आणि प्रशासकीय कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यातील गंभीर बाब म्हणजे घटना घडून महिना झाल्यानंतर आणि सर्वसाधारण सभेत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर महापालिकेने या बाबत पोलिसात तक्रार केल्याचे समोर येत आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत कॉँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी महापालिकेचा डेटा गायब झाल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर खुलासा करताना मिळकतकर विभागाचे उपायुक्त रवी पवार यांनी मागील महिन्यात हा प्रकार घडल्याचे सांगितले. संबंधित व्यक्तीला चौकशीसाठी बोलावून त्याला विचारणा केल्यानंतर 'हार्ड डिस्क' नेल्याची कबुली त्याने दिल्याचे पवार यांनी सर्वसाधारण सभेत सांगितले. संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, प्रत्यक्षात सोमवारी रात्री शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये या बाबत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापालिकेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील लाखो मिळकतधारकांची माहिती असलेल्या महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाशी संबंधित सर्व्हरमध्ये वापरली जाणारी ४ टीबी क्षमतेची हार्ड डिस्क गेल्या महिन्यात २५ मे रोजी सर्व्हर रूममधून गायब झाली. महापालिकेच्या लक्षात सुरुवातीला हा प्रकार आला नाही. सुमारे १५ दिवसांनी, ९ जून रोजी संबंधित फाईल्स आणि डेटाची माहिती मिळत नसल्याने सर्व्हर रूमची पडताळणी करण्यात आली. त्या वेळी हार्ड डिस्क जागेवर नसल्याचे लक्षात आले.

महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सीसीटीव्ही फूटेज तपासले असता. ज्या कर्मचाऱ्याकडे सर्व्हर रूमच्या देखरेखीची जबाबदारी होती, त्यानेच हा उद्योग केल्याचे समोर आले. त्यानंतर महापालिकेने संबंधित कर्मचाऱ्याला चौकशीसाठी बोलाविले. त्या वेळी हार्ड डिस्क गायब केल्याची कबुली दिली. पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत त सदस्यांनी पुणेकरांचा डाटा चोरीला गेल्याची गंभीर बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर यामध्ये तथ्य असल्याची कबुली महापालिका प्रशासनाने दिली. हार्ड डिस्क चोरणाऱ्या व्यक्तीला दम दिल्यानंतर त्याने चोरलेली हार्ड डिस्क परत केल्याचे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सभागृहात सांगितले.

### 'हार्ड डिस्क'ही फॉरमॅट

महापालिकेच्या मिळकतकर विभागातील माहितीचा समावेश या हार्ड डिस्कमध्ये होता. लाखो नागरिकांची माहिती त्यामध्ये होती. ही हार्ड डिस्क गायब केल्यानंतर संबधित व्यक्तीने फॉरमॅट केल्याने ही माहिती महापालिकेला मिळणार नाही.

### पुणे महापालिकेत सत्ताधाऱ्यांची मनमानी!

कोथरूड भागातील एक एकर जागेवर वृद्धाश्रम बांधून तो 'ग्रॅव्हिटी वेल्फेअर फाउंडेशन' या संस्थेला चालविण्याचा प्रस्ताव महापालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने मतदानाच्या जोरावर मान्य केला. ही जागा तीस वर्षांसाठी संबंधित संस्थेला देण्यात आली. निविदा न मागविता ही जागा देण्यात येत असल्याने कॉँग्रेससह दोन्ही राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या सदस्यांनी याला विरोध केला. मात्र, मतदान घेऊन हा प्रस्ताव मान्य करण्यात आला. 'ग्रॅव्हिटी वेल्फेअर फाउंडेशन' या संस्थेला ३६११.३६ चौरस मीटर जागा देण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. कोथरूड भागातील ही जागा आहे. या संस्थेला ३० वर्षांच्या भाडेकराराने ही जागा दिली जाणार असून, त्यावर बांधकाम संबंधित संस्थेच्या वतीने केले जाणार आहे.







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.